मेहकर- लोणार शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास सरकारला भिडणार >> पान 2

मेहकर व लोणार तालुक्यांचा अतिवृष्टीग्रग्रस्तांच्या यादीत समावेश करा, अन्यथा तीव्र आंदोलन रविकांत तुपकर >> पान 3

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुके 'मदत पॅकेज' मधून वगळले; शेतकऱ्यांचा आक्रोश पिकं गेली, घरं गेली... पण सरकारनं आमचं नावच पुसलं! >> पान 4

**सुविचार**

दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद शोधा.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 74 ■ शनिवार, दि. 11 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



उर्दू कवितेवर रॅप बनवणे अनीत पड्डाला पडले महागात: मुस्लिमांच्या भावना दुखावल्याचा आरोप, अभिनेत्रीचा जुना व्हिडिओ व्हायरल

आतील पान

# लोकांना कर्जमाफीचा नाद लागलाय!

## मंत्र्यांचं वादग्रस्त विधान; आम्ही काहीतरी आश्वासनं देतो कारण...

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील नेते वादग्रस्त विधानांमुळे आणि कृत्यांमुळे चर्चेत असल्याने विद्यमान सरकार अडचणीत आल्याचं यापूर्वी अनेक प्रकरणांमध्ये दिसून आलं आहे. वाल्मिक कराड कनेक्शनवरुन धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा देणं असो किंवा ऑनलाइन गेम प्रकरणावरुन माणिकराव कोकाटेंना मंत्रिपद बदलून देणं असो अनेकदा असे प्रकार मागील काही काळात घडले आहेत. यानंतर मुख्यमंत्र्यांसहीत दोन्ही उपमुख्यमंर्त्यांनी आपआपल्या पक्षातील मंत्र्यांना जपून विधानं करण्याचा सल्ला दिला होता. मात्र हा सल्ला मंत्र्यांनी फारसा मनावर घेतल्याचं दिसत नाही. असं म्हणण्याचं कारण म्हणजे विद्यमान सहकार मंत्री आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते बाबासाहेब पाटील यांनी कर्जमाफीबद्दल केलेलं विधान!



सहकार मंत्री नेमकं काय म्हणाले?

मराठवाड्यामध्ये सप्टेंबरच्या शेवटी आणि ऑक्टोबरच्या सुरुवातीला झालेल्या मुसळधार पावसामुळे लाखो हेक्टर जमिनीवरील पिकं उद्धवस्त झाली. पूरग्रस्त शेतकऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ३० हजार कोटींहून अधिकची मदत जाहीर केली. यामध्ये शेतकऱ्यांना नुकसानभरपाई किती दिली जाईल हे सुद्धा जाहीर केलं. असं असतानाच शेतकऱ्यांकडून कर्जमाफीची मागणी केली जात आहे. मात्र कर्जमाफीच्याच विषयावरुन मंत्री बाबासाहेब पाटलांनी वादग्रस्त विधान केलं आहे.

चोपाडा येथील दीपज बँकेच्या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना सहकार मंत्र्यांनी, ''लोकांना कर्जमाफीचा नाद लागला आहे,'' असं विधान केलं आहे. तसेच कर्जमाफीसंदर्भात बोलताना, ''निवडणुकीत निवडून येण्यासाठी आश्वासने द्यावी लागतात,'' असेही बाबासाहेब पाटील म्हणालेत.

आम्ही काहीतरी आश्वासनं देतो कारण आम्हाला निवडून यायचं असतं असंही बाबासाहेब पाटील म्हणालेत. ''आम्हाला निवडून यायचे आहे, त्यामुळे निवडणुकीत आम्ही काहीतरी आश्वासन देतो. निवडणुकीच्या काळात कोणी गावात नदी आणून द्या, अशी मागणी केल्यास, निवडून यायचे असल्याने नदी आणून दिल्याचं आश्वासन दिलं जातं,'' असं विधान बाबासाहेब पाटील यांनी यावेळेस केलं. बाबासाहेब पाटलांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वतुर्ळात आणि शेतकरी संघटनांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भाजपाकडून पहिली प्रतिक्रिया

कर्जमाफीचा विषय हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा आणि तितकाच संवेदनशील विषय आहे. निसर्गाचा कोप झाल्याने अतिवृष्टीमुळे हाती आलेलं पिक गमावलेल्या शेतकऱ्याला कर्जमाफीच्या माध्यमातून सरकारकडून दिलाश्याची अपेक्षा असतानाच सरकारमधील मंत्रीच अशी विधान करत असल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. दरम्यान, भाजपाचे नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बाबासाहेब पाटील यांच्या विधानावर पत्रकारांशी बोलताना, ''कोणीही सरकारमधल्यांनी अशी वक्तव्य करु नये,'' असं उत्तर दिलं आहे.

# प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेत महाराष्ट्रातील ९ जिल्ह्याची निवड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या न्यायासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांना अखेर यश मिळालं आहे. प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना ही शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांना आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल आहे. केंद्र सरकारने राज्यातील ९ जिल्ह्यांचा यात समावेश केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या हस्ते उद्या दिल्लीत या कार्यक्रमाचा शुभारंभ होणार आहे. राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा असं आवाहन. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे. महाराष्ट्र राज्यस्तरीय कार्यक्रम कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सभागृह, पुणे या ठिकाणी संपन्न होत आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारकडून प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना जाहीर करण्यात आली असून, या योजनेमध्ये कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाची उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या देशातील १०० जिल्ह्यांची निवड केंद्र शासनाने केली आहे. महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांची निवड झाली आहे. यात पालघर, रायगड, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या ९ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच, मराठवाड्यातील ३ जिल्ह्यांचा समावेश आहे. मात्र, पश्रि्चम महाराष्ट्रातील एकही जिल्हा



या यादीत नाही. या योजनेचा उद्देश शेतीत सुधारणा, उत्पादन वाढ, पीक विविधीकरण आणि शाश्र्वत शेतीला चालना देणे हा आहे. पुढील ६ वर्षे योजना राबवली जाणार असून या योजनेअंतर्गत दरवर्षी २४,००० कोटींचा निधी खर्च करण्याची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये धान्य साठवण, प्रक्रिया, सिंचन सुधारणा, तसेच स्थानिक पातळीवरील रोजगार निर्मिती यावर भर दिला जाणार आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, राज्यातील शेतकऱ्यांना या योजनेमुळे थेट लाभ मिळेल. शाश्र्वत शेती, पाणी बचत, आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून आपल्या शेतकऱ्यांचा आत्मविश्र्वास अधिक दृढ होईल. ही योजना म्हणजे 'शेतीला बळ आणि शेतकऱ्याला दिलासा' आहे. उद्याच्या कार्यक्रमात कृषी क्षेत्रात प्रयोगशील व प्रगतिशील कामगिरी करणारे ३०० हून अधिक शेतकरी सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत केंद्र आणि राज्य सरकारांच्या एकत्रित उपक्रमांतर्गत ११ विभागांच्या ३६ योजना एकत्रीत राबवल्या जाणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर तसेच कृषी विज्ञान केंद्रे, बाजार समित्या, किसान समृद्धी केंद्रे आणि सहकारी पतपुरवठा संस्था या सर्व स्तरांवर कार्यक्रमांची अंमलबजावणी होईल. सद्यस्थितीमध्ये राज्यांमध्ये केंद्र व राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६ हून अधिक केंद्रीय आणि राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे पिकांची उत्पादकता वाढवणे, पिक उत्पादनाची शाश्र्वतता सुनिश्रि्चत करणे तसेच काढणीपश्र्चात तंत्रज्ञान व पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशाने देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. उद्या प्रधानमंत्री धन- धान्य कृषि योजना, नैसर्गिक शेती व कडधान्य अभियान अंतर्गत मा. पंतप्रधान महोदयांच्या हस्ते शुभारंभ कार्यक्रम सर्व जिल्हा मुख्यालय, सर्व कृषी विज्ञान केंद्र, सर्व तालुका मुख्यालय, सर्व ग्रामपंचायत, सर्व प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र, सर्व प्राथमिक सहकारी कृषि पतपुरवठा पतसंस्था (पीएसीएस), सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये लोकप्रतिनिधी, कृषि व संलग्न विभागातील अधिकारी/कर्मचारी, कृषि विद्यापीठे / कृषि विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ, कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी, पीक स्पर्धा विजेती शेतकरी, नैसर्गिक शेती करीत असलेले शेतकरी, शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांचा समावेश केल्याबद्दल भरणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिहं चौहान यांचे आभारही भरणेंनी व्यक्त केले आहेत.

# योगेश कदमांवर पक्षश्रेष्ठी नाराज, एकनाथ शिंदेंच्या भेटीसाठी बंगल्यावर दोन तास ताटकळत बसण्याची वेळ

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी:** पुण्यातील कुख्यात कुंड निलेश घायवळ याचा भाऊ सचिन घायवळ याला शस्त्र परवाना मंजूर केल्यामुळे गोत्यात आलेले शिंदे गटाचे नेते आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे राजकीय ग्रह सध्या प्रतिकूल झाले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरोपांची राळ उडवून देत आणि राजीनाम्याची मागणी करत योगेश कदम यांना घेरले होते. त्यामुळे योगेश कदम यांची कधी नव्हे इतकी मोठी कोंडी झाली आहे. अशात त्यांचे वडील आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांचाही बचाव अपुरा पडत असल्याने योगेश कदम मोठ्या संकटात सापडले आहेत. अशातच आता योगेश कदम यांच्यावर त्यांचे पक्षश्रेष्ठी एकनाथ शिंदे हेदेखील प्रचंड नाराज असल्याची माहिती समोर आली आहे. या नाराजीमुळे योगेश कदम यांना शुक्रवारी तब्बल दोन तास एकनाथ शिंदे यांच्या बंगल्यावर ताटकळत बसण्याची वेळ आली.

सूत्रांच्या माहितीनुसार, गृहराज्यमंत्री योगेश कदम हे शुक्रवारी सकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटायला दक्षिण मुंबईतील मुक्तागिरी या बंगल्यावर गेले होते. मात्र, गेल्या दोन तासांपासून योगेश कदम याठिकाणी ताटकळत बसले आहेत. एकनाथ शिंदे हे अद्याप बंगल्यातील खालच्या दालनात आलेले नाहीत. त्यामुळे योगेश कदम हे खालच्या दालनातील खुर्चीवर बसून आहेत. योगेश कदम हे गृहखात्याचे राज्यमंत्री असूनही त्यांच्यावर एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी ताटकळत बसण्याची वेळ आल्याने राजकीय





वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. पुणे पोलिसांनी सचिन घायवळला शस्त्र परवाना देऊ नये, असा अहवाल दिला होता. तरीही योगेश कदम यांनी त्यांच्या अधिकारात, 'सचिन घायवळ हे बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांना दररोज मोठ्या रोख रक्कमेचे व्यवहार करावे लागतात', असे सांगत शस्त्र परवाना मंजूर केला होता. मात्र, सचिन घायवळ हा कुख्यात गुंड निलेशचा सख्खा भाऊ असल्याने विरोधकांनी या मुद्द्यावरुन टीकेची प्रचंड झोड उठवली होती. या टीकेचा प्रतिवाद करताना योगेश कदम यांना नाकीनऊ आले होते. न्यायालयाने सचिन घायवळला दोषमुक्त केले होते. त्यामुळे मी सब-कॉन्शिअस माईडने शस्त्र परवाना मंजूर करण्याचा निर्णय घेतल्याचे योगेश कदम यांनी म्हटले. यापेक्षा काही अधिक स्पष्टीकरण किंवा कारणमीमांसा योगेश कदम यांना करता आली नव्हती. त्यांचे वडील रामदास कदम यांनीही आक्रमक शैलीत आपल्या मुलाचा बचाव करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांनी अगोदरच बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनाविषयी वादग्रस्त वक्तव्य करुन वाद ओढावून घेतला होता. त्यामुळे रामदास कदम यांनी मुलासाठी केलेला बचावही तोकडा ठरला होता. या सगळ्यामुळे योगेश कदम यांनी आज एकनाथ शिंदे यांच्याकडे धाव घेतली होती. मात्र, एकनाथ शिंदे हेदेखील योगेश कदम यांच्यावर नाराज असल्याचे दिसत आहे. योगेश कदम आणि रामदास कदम यांच्यामुळे शिवसेनेची प्रतिमा मलीन होत असल्याचा सूर पक्षामध्ये उमटत आहे. सचिन घायवळचा शस्त्र परवाना मंजूर करुन योगेश कदम यांनी विरोधकांच्या हाती आयते कोलीत दिले आहे. कुख्यात गुंडाशी संबंध असल्याच्या मुद्द्यावरुन होणाऱ्या टीकेचा प्रतिवाद करणे शिवसेनेला अवघड झाले आहे. या सगळ्याची झळ पक्षाच्या प्रतिमेला बसत आहे. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे हे आज योगेश कदम यांना समजही देऊ शकतात, अशी चर्चा आहे. त्यामुळे आता एकनाथ शिंदे आणि योगेश कदम यांच्या भेटीत काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# विशेष मदत पॅकेजपासून वंचित चार तालुके अतिवृष्टी व पूर बाधित घोषित करा- केंद्रीयमंत्री ना. प्रतापराव जाधव

## मेहकर, लोणार, जळगाव जा, संग्रामपूर तालुक्यात विशेष मदत पॅकेज व सवलती लागु करा

**दैनिक आपला विदर्भ**

**केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांची राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांच्याशी चर्चा; शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** अतिवृष्टीने बाधित झालेल्या आपदग्रस्तांसाठी शासनाने जाहीर केलेल्या विशेष मदत पॅकेजमधून बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर , लोणार ,जळगाव जामोद आणि संग्रामपूर तालुके वंचित राहीले आहे . ही बाब केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांच्याशी संपर्क साधुन निदर्शनास आणून दिली आहे .तर जिल्हाधिकारी यांना सुद्धा काही तांत्रिक चूक झाली का ? यांचा शोध घेण्याबाबत निर्देशित केले आहे.

जुन ते सप्टेंबर महिन्यात राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या आपतगस्तांना मदत देण्याच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारच्या वतीने ९ सष्टेबर रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे . या अपादग्रस्त मदत यादीत राज्यातील २५३ तालुक्यांचा समावेश आहे या तालुक्यात ढगफुटी अतिवृष्टी आणि पुर परिस्थितीमुळे क्षेत्र बाधित झाले होते या शासन निर्णयामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील ९ तालुक्यांचा समावेश आहे परंतु १६ सष्टेबरला मेहकर ,लोणार संग्रामपूर आणि जळगाव जामोद संग्रामपूर या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती पण आपदतग्रस्तांच्या मदतीसाठी निर्गमित झालेल्या शासन निर्णयामध्ये या चारही तालुक्यांचा समावेश नाही . सदरची बाब केंद्रीयमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी आज राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री पाटील यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे . या संदर्भात त्यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्याशी सुद्धा संपर्क साधला आहे बुलढाणा जिल्ह्यातील हे



चारही तालुके अतिवृष्टीने बाधित असताना या तालुक्यांचा समावेश का झाला नाही काही तांत्रिक चूक राहून गेली का ? हे तपासून पाहण्यासंदर्भात त्यांनी निर्देशित केले. या चारही तालुक्यांचा समावेश शासनाच्या आपद्ग्रस्त मदत यादीत समावेश करण्यासंदर्भात शासन स्तरावरही चर्चा केली आहे. शासनाच्या मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याची सूचनाही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत.

# पंकजा मुंडेंच्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची विक्री?

## सहकार क्षेत्रात मोठी खळबळ

**बीड/प्रतिनिधी:** बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना विक्रीच्या चर्चांमुळे सध्या सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी स्थापन केलेल्या या प्रतिष्ठित सहकारी साखर कारखान्याची विक्री झाली असल्याचा गंभीर आरोप कायदाविषयक सल्लागार परमेश्वर गीते यांनी केला आहे. परमेश्वर गीते हे काही काळ या कारखान्याशी कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत होते. त्यांनी सदर विक्री थांबवावी, अशी मागणी करत बीडचे जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज देखील सादर केला आहे.

भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्ष राहिलेल्या आहेत. हा कारखाना मंत्री पंकजा मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या सोयीसाठी भाडेतत्त्वावर चालवण्यासाठी दिला होता. मात्र, संपूर्ण कारखाना विक्रीसाठी काढण्यात आल्याचा आरोप आता पुढे आल्याने सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी पंकजा मुंडे यांच्या ताब्यातील पनगेश्वर साखर कारखान्याची विक्री झाली होती. त्यामुळे गोपीनाथ मुंडे यांनी उभा केलेल्या वैद्यनाथ साखर कारखान्याच्याही भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

परळी आणि पांगरी परिसरातील शेतकऱ्यांना ऊस गाळपासाठी जवळचा पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी गोपीनाथ मुंडे यांनी हा कारखाना उभारला होता. त्यामुळे या कारखान्याची विक्री झाल्याच्या चर्चांनी मोठं वादळ निर्माण झालं आहे. वैद्यनाथ साखर कारखान्याची खरेदीखत रोखण्याच्या मागणीसाठी परमेश्वर गीते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज देखील केले आहे. आता या प्रकरणात नेमकी काय माहिती समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## महानायकाचा वाढदिवस

आज ११ ऑक्टोबर हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे ( हरिवंशराय बच्चन ) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८३ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मेहकर- लोणार शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास सरकारला भिडणार : आमदार खरात यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : जून २०२५ मधील भीषण ढगफुटीने उद्ध्वस्त झालेल्या मेहकर आणि लोणार तालुक्यांना शासनाच्या अतिवृष्टीग्रस्त यादीतून वगळल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या निर्णयावर संताप व्यक्त करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे "दोन दिवसांत मेहकरलोणारचा समावेश झाला नाही, तर मग गाठ माझ्याशी आहे!''

आ. खरात यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या सविस्तर पत्रात नमूद केले आहे की, २५ आणि २६ जून २०२५ रोजी मेहकर तालुक्यात तब्बल २१० मिमी पाऊस झाला होता. अतिवृष्टीमुळे गावोगाव शेती, घरे आणि रस्त्यांचे मोठे नुकसान झाले. नद्यानाले, ओढे वाहून गेल्याने सुमारे ६६,००० हेक्टर शेतीयोग्य जमीन गाळाखाली दबली असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची शेती आजही अकार्यक्षम स्थितीत आहे.

खरात यांनी म्हटले आहे ज्यांनी ढगफुटीची पहिली झळ सोसली, त्या तालुक्यांना यादीतून वगळणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा क्रूर निर्णय आहे. शासन निर्णय २७ मार्च २०२३ नुसार नुकसानभरपाईच्या प्रक्रियेत सुधारणा करून हेक्टरी किमान ₹५०,००० मदत द्यावी. तसेच बुजलेल्या विहिरी, सिंचन संच, पाईपलाइन, फळबागा आणि बागायती जमिनींचाही समावेश करावा.''

ते पुढे म्हणाले शेतकऱ्यांचा आवाज मी गप्प होऊ देणार नाही. सरकारने तातडीने सुधारित शासन निर्णय जाहीर करून मेहकरलोणारचा समावेश करावा. अन्यथा संघर्ष उभा राहील आणि जबाबदारी सरकारची असेल.''

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून तयार केलेले निवेदन आज उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांच्याकडे सादर करण्यात आले.

या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, भास्करराव गारोळे, निंबाजी पांडव, किशोर गारोळे, दिलीप वाघ, ॲड. आकाश घोडे, तेजराव घायाळ, राजुभाऊ बुधवत, ॲड. संदीप गवई, ऋषी जगताप, आरती देशमुख, विलास शिंदे, गजानन राठोड, कडुबा शेजुळ, समाधान ठाकरे, विठ्ठल चव्हाण, रफिक गवळी, स्वप्निल हाडे, दीपक गायकवाड, जावेद खान, छगन सांगोळे, ध्यानेश्वर पातले, गणेश गावंडे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. खरात यांच्या इशाऱ्यानंतर मेहकरलोणार परिसरातील शेतकऱ्यांमध्ये नव्या आंदोलनाच्या शक्यतेची चर्चा सुरू झाली असून सरकारची पुढील भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सरन्यायाधीश गवई यांचा मोठा निर्णय! भर न्यायालयात केली घोषणा, 'आता सर्वोच्च न्यायालयात'

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी** : १४ मे २०२५ रोजी न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील एक सर्वसामान्य कुटुंबातून न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च पदापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी ठरला आहे. सरन्यायाधीशपद स्वीकारल्यानंतर त्यांनी न्यायालयीन व्यवस्थापन अधिक पारदर्शक व लोकाभिमुख करण्यावर भर दिला आहे.

त्यांच्या कार्यकाळात सर्वोच्च न्यायालयातील खंडपीठांचे कार्य सुरळीत चालावे, प्रकरणांचे प्राधान्याने निपटारे व्हावेत आणि न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब कमी व्हावा यासाठी त्यांनी प्रशासकीय सुधारणा आरंभ केल्या. सरन्यायाधीश गवई हे स्वत: संवेदनशील, तत्त्वनिष्ठ आणि संतुलित विचारधारेचे न्यायाधीश म्हणून ओळखले जातात.

सर्वोच्च न्यायालयात येण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. त्यांनी अनेक महत्त्वाच्या घटनात्मक आणि सामाजिक दृष्ट्या परिणामकारक प्रकरणांमध्ये निर्णायक भूमिका बजावली आहे. कलम ३७० रद्दबातल प्रकरण, इलेक्टोरल बाँड योजना रद्द करण्याचा निर्णय, तसेच दलित, आदिवासी आणि दुर्बल घटकांच्या हक्कांशी निगडित प्रकरणांमध्ये त्यांनी संवेदनशील दृष्टिकोन ठेवला. सरन्यायाधीश गवई यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाची वैशिष्ट्य म्हणजे न्यायव्यवस्थेतील सामाजिक प्रतिनिधित्वाची जाणीव. ते सर्वोच्च न्यायालयात पोहोचलेले मोजक्या दलित न्यायाधीशांपैकी एक असून, त्यांच्या नियुक्तीने भारतीय न्यायसंस्थेच्या समावेशकतेचा संदेश दिला.

त्यांच्या कार्यकाळात सर्वोच्च न्यायालयाने संविधानिक मूल्यांचे रक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, पर्यावरणीय न्याय आणि पारदर्शक प्रशासन यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यांचा कार्यकाळ तुलनेने अल्प २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत असला, तरी त्यांनी घेतलेली पावले आणि दिलेल्या दिशा न्यायसंस्थेच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

गवईची घोषणा काय?

सर्वोच्च न्यायालयाच्या डिजिटल पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यासाठी आणि सर्व न्यायालयीन वापरकर्त्यांना सुलभता मिळावी या उद्देशाने भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी शुक्रवारी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. त्यांनी सांगितले की, आता सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य इमारतीत संपूर्णपणे मोफत सार्वजनिक वाय-फाय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यापूर्वी ही सुविधा फक्त न्यायालयीन कक्षांपुरती आणि काही शेजारच्या भागांपुरतीच मर्यादित होती. सरन्यायाधीश गवई म्हणाले, ''डिजिटल पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या आणि न्यायालयीन परिसरातील वकील, कायदा अधिकारी, पक्षकार आणि न्यायालयीन अधिकारी यांना वाय-फाय सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने, सर्वोच्च न्यायालयातील मोफत सार्वजनिक वाय-फाय सेवा ङ्ख जी आतापर्यंत केवळ न्यायालयीन कक्षांमध्ये आणि काही शेजारील भागातच उपलब्ध होती ङ्ख आता सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य इमारतीच्या संपूर्ण परिसरात विस्तारण्यात आली आहे.'' ते पुढे म्हणाले की, आता वकील आणि भेट देणारे नागरिक साध्या प्रमाणीकरण प्रक्रियेद्वारे न्यायालयाच्या मुख्य इमारतीतील कोणत्याही भागातून सहजपणे मोफत इंटरनेट वापरू शकतील. ''ही छोटी पण महत्त्वाची पायरी बारच्या माननीय सदस्यांसह न्यायालयात येणाऱ्या पक्षकारांसाठी उपयुक्त ठरेल, अशी मला आशा आहे,'' असे सरन्यायाधीश गवई यांनी नमूद केले.

## संभाजीनगर: फॉर्म भरायला गेली अनब परतीलच नाही, बारावीच्या विद्यार्थिनीला शिक्षकाने नेलं पळवून

दैनिक आपला विदर्भ

**सिल्लोड/प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड तालुक्यात एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. इथं एका व्यक्तीने गुरुशिष्याच्या नात्याला कलंक फासला आहे. संबंधित शिक्षक ज्या कॉलेजमध्ये शिकवत होता, त्याच कॉलेजमधील एका विद्यार्थिनीला फूस लावून आरोपी शिक्षकाने पलायन केलं आहे. एका शिक्षकानेच अशाप्रकारे कॉलेजच्या विद्यार्थिनीसोबत पळ काढल्याने महाविद्यालय प्रशासनात खळबळ उडाली आहे.

ही घटना सिल्लोड तालुक्यातील अजिंठा येथे घडली. आरोपी शिक्षकाने लग्नाचं अमिष दाखवून आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील १२वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेलं आहे. याप्रकरणी ४० वर्षीय शिक्षकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुशिष्य नात्याला काळीमा फासला असून या घटनेचा सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिल्लोड तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन विद्यार्थिनी अजिंठा येथील एका महाविद्यालयात १२वीच्या वर्गात शिकत होती. या विद्यार्थिनीला याच कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त देवेंद्र किशोर तायडे या शिक्षकाने विविध आमिषे दाखवून प्रेमाच्या जाळ्यात ओढले. सदरील विद्यार्थिनी टीईटी फॉर्म भरायला सिल्लोडला जात आहे, असे सांगून घरातून निघून गेली, ती परतली नाही.

त्यामुळे या मुलीच्या नातेवाइकांनी अधिक चौकशी केली असता याच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक देवेंद्र किशोर तायडे याने, तुझे शिक्षण पूर्ण करेन, लग्नही करेन, असे आमिष दाखवून एका कारमधून तिला पळवून नेल्याचे समजले. या प्रकरणी अजिंठा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून शिक्षक आरोपी देवेंद्र किशोर तायडे हा फरार झाला आहे. पोलीस दोघांचा तपास करत आहेत.

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोल्यात स्थापण्यासाठी समिती नेमावी – उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरू करण्याच्या कार्यवाहीसाठी तीन सदस्यीय समिती नेमावी. या समितीने उपकेंद्रासाठी योग्य जागेची पाहणी करून सविस्तर आराखडा सादर करावा, असे निर्देश सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

मंत्रालयात उच्च व तंत्रशिक्षण विभागाची बैठक झाली. राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार रणधीर सावरकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, सहसचिव संतोष खोरगडे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, विद्यापीठाचे रजिस्ट्रार तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जे.जे.कला महाकवद्यालयात आर्ट म्युझियम उभारावे

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. येथील कलाकृती पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहाव्यात, याकरिता आधुनिक सुविधांसह आर्ट म्युझियम उभारावे.

यावेळी सर जे. जे. कला महाविद्यालयाच्या समृद्ध कलावैभवाचे जतन, संवर्धन आणि प्रदर्शनासाठी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त आर्ट गॅलरी उभारण्याच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या गॅलरीत संस्थेतील ऐतिहासिक व दुर्मिळ कलाकृतींचे डिजिटल दस्तऐवजीकरण, विद्यार्थ्यांसाठी संशोधन व अभ्यासासाठी खुले प्रदर्शन विभाग, तसेच आधुनिक कलाप्रदर्शनासाठी स्वतंत्र दालन उभारण्याबाबतही चर्चा झाली. बैठकीस तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे प्राचार्य राजीव मिश्रा, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, सहसचिव संतोष खोरगडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई नियामक परिषदेचे पाचवी बैठक झाली. या बैठकीत अकोला जिल्ह्यातील पातूर येथील महात्मा फुले कला विज्ञान महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आढावा घेण्यात आला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### उर्दू कवितेवर रॅप बनवणे अनीत पड्डाला पडले महागात:मुस्लिमांच्या भावना दुखावल्याचा आरोप, अभिनेत्रीचा जुना व्हिडिओ व्हायरल

**मुंबई/प्रतिनिधी:** ''सैयारा'' फेम अनीत पड्डा तिच्या एका जुन्या व्हिडिओमुळे अडचणीत सापडली आहे. तिच्या अडचणींचे कारण प्रसिद्ध उर्दू कविता ''लब पे आती है दुआ'' आहे. जुन्या व्हायरल व्हिडिओमध्ये, अभिनेत्री प्रसिद्ध कवी मोहम्मद इक्बाल यांची ही कविता रॅप शैलीत गात असल्याचे दिसत आहे, ज्यावर सोशल मीडिया वापरकर्ते मुस्लिमांच्या भावना दुखावल्याचा आरोप करत आहेत.

यापूर्वी तिच्या चित्रपटांमुळे आणि साधेपणामुळे लक्ष वेधून घेतलेली अनीत आता पहिल्यांदाच ट्रोलर्सच्या निशाण्यावर आली आहे. एका वापरकर्त्याने नाराजी व्यक्त करत लिहिले, ''जगात इतकी गाणी नव्हती का की तू नाटवर नाचत आहेस?'' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, ''या कृत्यामुळे निराश झालो.'' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, ''अनीत, अशा प्रकारची वागणूक तुला शोभत नाही.''

''सैयारा'' चित्रपटातून एका रात्रीत स्टार बनलेली अनीतच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, ती लवकरच आणखी एका प्रेमकथेत दिसणार आहे. ''बँड बाजा बारात'' फेम दिग्दर्शक मनीष शर्मा अनितसोबत एक रोमँटिक चित्रपट दिग्दर्शित करणार आहेत. यशराज फिल्म्स या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. मीडिया रिपोर्ट्र्सनुसार, अनीतला त्यांच्या नवीन चित्रपटासाठी कास्ट करण्यात आले आहे.

मिड-डेच्या वृत्तानुसार, चित्रपटाचे प्री-प्रॉडक्शन काम आधीच सुरू झाले आहे. या रोमँटिक चित्रपटात अनीत मुख्य भूमिकेत आहे, तो पंजाबमध्ये शूट केला जाईल. २०२६ च्या पहिल्या सहामाहीत चित्रीकरण सुरू होणार आहे. चित्रपटात अनीतसोबत कोण काम करेल याबद्दल अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

### फिलिपिन्समध्ये ७.३ रिश्टर स्केलचा भूकंप, त्सुनामीचा इशारा जारी

मनिला : फिलिपिन्समधील मिंडानाओ भागात आज शुक्रवारी सकाळी जोरदार भूकंप झाला आहे. या भूकंपाची तीव्रता ७.३ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली आहे. या भूकंपानंतर स्थानिक भूकंप विज्ञान संस्था फिवोल्क्सने सुनामीचा इशारा जारी केला आहे. समुद्र किनाऱ्यालगत राहणाऱ्या नागरिकांना तत्काळ सुरक्षित ठिकाणी जाण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

प्राथमिक माहितीनुसार, कोणतीही मोठी हानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही, पण इतक्या तीव्र भूकंपामुळे लोक घाबरून घराबाहेर धावले. मृतांची किंवा जखमींची अधिकृत पुष्टी झालेली नाही. हा भूकंप मिंडानाओ आणि आजूबाजूच्या भागांसाठी एक गंभीर इशारा आहे, कारण हे क्षेत्र भूकंपसदृश सक्रिय विभागात गणलं जातं. स्थानिक प्रशासनानं नुकसान झालेल्या भागांमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरू केलं आहे. प्राधान्यक्रमाने रुग्णालयं, रस्ते आणि गंभीररित्या प्रभावित इमारतींसाठी मदत दिली जात आहे.७.३ तीव्रतेचा भूकंप अत्यंत शक्तिशाली असतो, ज्यामुळे केवळ इमारती कोसळत नाहीत, तर रस्त्यांचंही प्रचंड नुकसान होते आणि लोकांना गंभीर दुखापती किंवा जीवितहानी होण्याची शक्यता असते.

त्सुनामीचा धोका : विशेष म्हणजे, या भागातील भूकंपाचं केंद्र अनेकदा समुद्राखाली असते, त्यामुळे येथे त्सुनामीचा मोठा धोका देखील असतो. भूकंपामुळे समुद्रतळात झालेल्या हालचालींमुळे प्रचंड मोठ्या लाटा निर्माण होऊ शकतात, ज्या किनारपट्टीलगतच्या भागांना मोठी हानी करू शकतात. समुद्रकिनाऱ्यावर वसलेली अनेक मोठी शहरं आणि गावं या लाटांच्या प्रभावाखाली येऊ शकतात. यामुळे मानवी आणि आर्थिक नुकसान आणखी वाढू शकते. फिलिपिन्सची घनदाट लोकसंख्या आणि प्रमुख शहरं समुद्रकिनाऱ्याजवळ वसलेली असल्यानं या सर्व गोष्टी भूकंपीय धोक्याला अधिक गंभीर बनवतात. अशा भूकंपांमध्ये केवळ जीवितहानीच होत नाही, तर मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होते.

### गुन्हेगारांवर नाशिक पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राईक'; भाजपनंतर शिंदे गटाच्या बड्या नेत्यांच्या अडचणी वाढल्या, थेट गुन्हे दाखल

**नाशिक/प्रतिनिधी:** नाशिक शहरातील गुन्हेगारीचा वाढता आलेख कमी करण्यासाठी शहर पोलिसांनी आवश्यक पावले उचलली असून आयुक्त संदीप कर्णिक आता थेट रस्त्यावर उतरले आहेत. शहरातील गुन्हेगारीला राजकीय नेत्यांचे मिळणारे पाठबळ बघता पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी नाशिकमध्ये मोठी कारवाई केली आहे. गंगापूर आणि सातपूर येथे झालेल्या दोन वेगवेगळ्या गोळीबाराच्या घटनेत भाजप नेते सुनील बागुल यांचा पुतण्या अजय बागुलवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. तर आरपीआय जिल्हाध्यक्ष लोंढे पिता पुत्रांना देखील पोलिसांनी जेरबंद केले आहे. तर आता भाजपनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे पदाधिकारी देखील नाशिक पोलिसांच्या रडारवर आहेत.

# मेहकर व लोणार तालुक्यांचा अतिवृष्टीग्रग्रस्तांच्या यादीत समावेश करा, अन्यथा तीव्र आंदोलन रविकांत तुपकर

## रविकांत तुपकरांची मुख्यमंत्र्याकडे मागणी.. तुपकरांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट, क्रांतिकारी चा आंदोलनाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी:** १० ऑक्टोबर रोजी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांच्या शिष्ट मंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. या प्रतिनिधी मंडळाने मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करून मेहकर व लोणार तालुक्यांचा मदतीच्या पॅकेजमध्ये समावेश करावा अशी ठाम मागणी केली अन्यथा आक्रमक आंदोलन करू असा इशारा दिला.

तुपकर यांनी सांगितले की, लोणार व मेहकर तालुक्यात गेल्या काही दिवसांत म्हणजे जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस पडून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेती पूर्णपणे खरडून गेली असून सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला असून अनेक ठिकाणी शेतजमिनीवर दगड,पाणी व गाळ साचल्याने पुढील पिकांच्या पेरण्या देखील धोक्यात आल्या आहेत.

रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारवर तीव्र निशाणा साधतांना सांगितले की, ''राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २५३ तालुक्यांचा समावेश मदत पॅकेजमध्ये करण्यात आला आहे, मात्र उर्वरित १०५ तालुक्यांना अन्यायकारकरीत्या वगळण्यात आले आहे. हे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. लोणार व मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांना या पॅकेजपासून वंचित ठेवणे हा सरकारचा अन्यायकारक निर्णय आहे.''

तुपकर यांनी पुढे इशारा दिला की,''जर मेहकर व लोणार तालुक्यांचा समावेश तात्काळ अतिवृष्टी ग्रस्तांच्या मदत पॅकेजमध्ये करण्यात आला नाही, तर क्रांतिकारी शेतकरी संघटना तिव्र आंदोलन छेडेल. सरकारने या आंदोलनाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी.''

यावेळी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशासनाने प्रतिनिधी मंडळाचे निवेदन स्विकारून ते मुख्यमंत्री यांचेकडे पाठविण्याचे आश्वासन दिले व दोन्ही तालुके अतुवृष्टिग्रस्तांच्या यादीत घेण्याचा शब्द दिला. निवडणूकीतील वचपा काढण्यासाठीच तालुके वगळले-तुपकर लोकसभा निवडणूकीमध्ये या तालुक्यांमध्ये रविकांत तुपकर यांना भरघोस मतदान झाल्यामुळे व मंत्री प्रतापरावांना अपेक्षित मतदान न झाल्यामुळे तसेच राजकीय द्वेषभावनेतून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मेहकर व लोणार तालुक्यातील जनतेला अद्दल घडवण्यासाठीच या तालुक्यांना मदत पॅकेज मधुन वगळल्याचा आरोप शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी माध्यमांशी बोलतांना केला.अशा कठीण प्रसंगी शेतकरी अडचणीत असतांना सुध्दा सत्तेतील काही लोकांना राजकारण सुचत आहे हे दुर्दैवी आहे,सरकार काही तालुक्यांना वगळून रडीचा डाव खेळत आहे असेही तुपकर म्हणाले

क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या या आंदोलनामुळे बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा एकदा जागृत झाल्या आहेत. आता शासनाचा पुढील निर्णय काय येतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी क्रांतिकारी चे पदाधिकारी सहदेव लाड, अमोल मोरे, नितीन सानप , देवीदास सरकटे , गजानन नाईकवाडे, गणेश अंभोरे,योगेश तुपकर, गजानन डिगोळे यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आयपीएलचा डिसेंबर धमाका! ऑक्शनची तारीख ठरली

**मुंबई/प्रतिनिधी:** आयपीएल २०२६ साठीची तयारी जोमात सुरू झाली आहे. जरी पुढचा हंगाम अजून थोडा लांब असला, तरी त्याआधी खेळाडूंची लिलाव प्रक्रिया आणि त्यापूर्वी रिटेन्शनची अंतिम यादी तयार होणार आहे. दरम्यान, पुढील आयपीएल हंगामापूर्वीच्या काही महत्त्वाच्या तारखा समोर आल्या आहेत. आयपीएलच्या पुढील हंगामापूर्वी लिलाव पार पडणार आहे. मात्र, या वेळचा लिलाव मेगा नसून मिनी ऑक्शन असेल. क्रिकबझच्या अहवालानुसार, १३ ते १५ डिसेंबरदरम्यान कोणत्याही दिवशी हा लिलाव पार पडू शकतो. अद्याप बीसीसीआय आणि आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलने नेमकी तारीख निश्चित केलेली नाही, पण याच कालावधीत अधिकृत घोषणा होईल, अशी शक्यता आहे.

गेल्या दोन हंगामांमध्ये आयपीएलचा लिलाव भारताबाहेर झाला होता, पण यंदा तसं होणार नाही असं दिसतंय. म्हणजेच या वेळी लिलाव भारतातच होईल. लिलावाचे स्थळ कोलकाता किंवा बंगळुरू असू शकते. मात्र, बीसीसीआयने एखाद नवं वेन्यू ठरवलं, तरी त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. आयपीएल संघांना त्यांच्या आवडीचे खेळाडू ठेवण्यासाठी म्हणजेच रिटेन करण्यासाठीची शेवटची तारीख १५ नोव्हेंबर निश्चित करण्यात आली आहे.

### म्हाडा अभियंत्याला ४० हजारांची लाच घेताना अटकष्ठ कारवाई न करण्यासाठी मागितली ४ लाखांची लाच

**मुंबई/प्रतिनिधी:** अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी ४ लाखांची लाच मागणारा म्हाडाचा कार्यकारी अभियंता मुंबईच्या लाचलुतपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला आहे. लाचेच्या रकमेतील ४० हजार रुपयांचा पहिला हफ्ता घेताना त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई गुरूवारी संध्याकाळी करण्यात आली.

तक्रारदारांचे रो हाऊस आहे. त्यावर अनधिकृत पत्रे चढवून तेथे पोटभाडेकरू ठेवण्यात आले होते. याबाबत म्हाडामध्ये अहवाल देऊन कारवाई करण्याची धमकी म्हाडामधील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाने दिली होती. याबाबत कारवाई न करण्यासाठी त्याने ४ लाखांची लाच मागितली. तडजोडीनंतर २ लाख स्वीकारण्याचे कबून केले. परंतु तक्रारदारांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.

या तक्रारीची पडताळणी करण्यात आली. आरोपीने २ लाखांपैकी पहिला हप्ता म्हणून ४० हजार घेऊन येण्यास सांगितले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचला आणि आरोपीला पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त संदीप दिवाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा तपास अधिकारी (सहाय्यक पोलीस आयुक्त) मानसिंग पाटील पर्यवेक्षण अधिकारी (पोलीस निरीक्षक) गणपत परचाके यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी १०० टक्के नुकसानभरपाई

## जलसंपदा मंत्री गुलाबराव पाटील यांचे आश्वासन

## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री दिलेलं आश्वासन पूर्ण होणार; कर्जमाफीवरही सरकार गंभीर

दैनिक आपला विदर्भ



**जळगाव/प्रतिनिधी:** राज्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीच्या आत १०० टक्के नुकसानभरपाई मिळणार असल्याचे आश्वासन जलसंपदा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले आहे. गेल्या काही आठवड्यांमध्ये राज्यभरातील अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शासनाने तत्काळ मदतीची प्रक्रिया सुरू केली आहे.

दिवाळीपूर्वी खात्यात मदतीची रक्कम'' पाटील गुलाबराव पाटील म्हणाले, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासन त्यांच्यासोबत ठामपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यात नुकसानभरपाईची रक्कम जमा केली जाणार आहे.''

त्यांनी पुढे सांगितले की काही ठिकाणी पंचनामे पूर्ण करण्यास उशीर झाला असला, तरी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी स्वतः या कामावर लक्ष ठेवले आहे.

मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी दिलेले आश्वासन १०० टक्के पूर्ण होईल. कोणत्याही पात्र शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही,'' असे पाटील यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विचार सुरुच**

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठीही सरकार गंभीर असल्याचे गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडला आहे. त्याला सावरण्यासाठी सरकारने विशेष पॅकेज जाहीर केले आहे. मात्र यासोबतच कर्जमाफीचा विचार देखील सुरु आहे. हे आम्ही सुरुवातीपासूनच सांगितले आहे आणि सरकार त्यावर ठोस निर्णय घेण्यासाठी कटिबद्ध आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

**लाडकी बहिण' योजनेंवर राजकीय खडाजंगी**

पत्रकार परिषदेदरम्यान 'लाडकी बहिण' योजनेवरून विरोधकांनी केलेल्या टीकेवरही पाटील यांनी प्रतिक्रिया दिली.

विरोधकांनी 'लाडकी बहिण' योजनेवर बोलूच नये. त्यांनी त्या योजनेवरून चिडवू नये, कारण आगामी निवडणुकीत या लाडक्या बहिणीच त्यांना त्यांच्या जागी बसवतील,'' असे पाटील यांनी टोला लगावला.

शेतकऱ्यांना दिलासा देणारी दिशा शासनाने नुकतेच जाहीर केलेल्या विशेष मदत पॅकेजनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान, घर पडझड, जनावरांच्या मृत्यू तसेच सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीबाबत आर्थिक मदत दिली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री पाटील यांचे वक्तव्य शेतकऱ्यांसाठी दिवाळीपूर्वी दिलासा देणारे संकेत मानले जात आहेत.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाईची १००% रक्कम मिळणार. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दिलेलं आश्वासन पूर्ण होईल.

पंचनामे पूर्ण करण्याचे काम युद्धपातळीवर. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरही सरकार गंभीर; निर्णय प्रक्रियेत. 'लाडकी बहिण' योजनेवरून विरोधकांना पाटील यांचा टोला ''लाडक्या बहिणी निवडणुकीत उत्तर देतील.''

# एक कोटींच्या बनावट नोटा जप्त, पाच आरोपींच्या मुसक्या आवळल्या

## पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी बनावट नोट प्रकरणातील कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी:** पश्चिम महाराष्ट्रात बनावट चलनी नोटांच्या व्यवहारावर मोठा आघात करत सांगली पोलिसांनी तब्बल एक कोटी रुपयांच्या बनावट नोटा जप्त करत पाच जणांना अटक केली आहे. ही कारवाई सांगली जिल्ह्यातील मिरज येथील महात्मा गांधी पोलिस ठाण्याच्या पथकाने केली असून, इतक्या मोठ्या प्रमाणात बनावट नोटा जप्त होण्याची ही पश्चिम महाराष्ट्रातील आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकाने छापा टाकून आरोपींकडून ५०० आणि २०० रुपयांच्या मोठ्या प्रमाणात बनावट नोटा, झेरॉक्स मशीन, नोटा मोजण्याचे यंत्र, स्कॅनर-प्रिंटर व इतर साहित्य जप्त केले. या सर्व उपकरणांचा वापर करून आरोपी बनावट चलन तयार करीत असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी इब्रार इनामदार, सुप्रीत देसाई, राहुल जाधव, नरेंद्र शिंदे आणि सिद्धेश म्हात्रे या पाच आरोपींना अटक केली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील मुख्य आरोपी इब्रार इनामदार हा कोल्हापूर पोलीस विभागात चालक म्हणून कार्यरत असल्याने पोलिस यंत्रणेत खळबळ उडाली आहे.


घटनेची माहिती सांगताना पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी सांगितले की, ''बनावट चलन तयार करून बाजारात पुरवठा करणाऱ्या या टोळीवर पोलिसांनी बारकाईने लक्ष ठेवले होते. अखेर पथकाने योग्य वेळी छापा टाकून ही मोठी कारवाई यशस्वी केली.'' या वेळी अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रणील गिल्डा, पोलिस निरीक्षक सतीश शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंदे आदी अधिकारी उपस्थित होते.




सांगलीसह कोल्हापूर, सातारा परिसरात या बनावट नोटांचा वापर होत असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, या टोळीच्या इतर संपर्कांचा तपास सुरू आहे. बनावट चलनाच्या या व्यवहारामागील जाळे उघड करण्यासाठी पोलिसांकडून पुढील चौकशी सुरू आहे.

# बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुके 'मदत पॅकेज' मधून वगळले; शेतकऱ्यांचा आक्रोश पिकं गेली, घरं गेली... पण सरकारनं आमचं नावच पुसलं!

## अतिवृष्टीत उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमा अजूनही ओल्या मदतीच्या यादीतून वगळल्याने शासनावरील विश्वास ढळला







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी:** या वर्षीच्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. पिकं वाहून गेली, जनावरं मरून गेली, घरं चिखलात गाडली गेली आणि आता शासनाच्या 'मदत पॅकेज'च्या यादीतून नाव वगळलं गेलं. ही फक्त चूक नाही हा भावनांचा अपमान आणि अस्तित्वावरचा घाव आहे.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'विशेष मदत पॅकेज' अंतर्गत २५३ तालुक्यांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. मात्र बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर आणि लोणार हे दोन तालुके या यादीतून वगळले गेल्याने शेतकऱ्यांच्या मनात तीव्र संताप उसळला आहे. या भागात अतिवृष्टीमुळे झालेलं नुकसान इतकं प्रचंड आहे की, अनेक शेतकऱ्यांची शेती, जनावरं आणि घरं एका रात्रीत नष्ट झाली. पणशासनानेमात्रयावेदनेवरमौनपाळलं. आमचं आयुष्य पाण्यात गेलं... पण शासनाचं हृदय मात्र कोरडं राहिलं'' मेहकर आणि लोणारच्या शेतकऱ्यांसाठी हा काळ अतिवृष्टीचा नव्हे, अन्यायाचा पाऊस ठरला आहे. आयुष्यभर श्रम करून उभं केलेलं घर, पिक, जनावरं आणि संसार एका ढगांच्या खेळामुळे वाहून गेलं. शेतकरी अजूनही ढिगाऱ्यातून अन्न शोधत आहे, आणि शासनाकडून मदतीची आशा धरून आहे. पण यादीत नावच नाही हे कसं न्याय्य म्हणायचं?

स्थानिकांचा संताप आणि हक्काची मागणी स्थानिक संघटनांनी शासनाच्या निर्णयाचा निषेध केला असून, मेहकर आणि लोणार तालुके 'मदत पॅकेज'मध्ये तातडीने समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. ''आमचं नुकसान कागदावर दाखवायला मोजमाप नाही; ते मोजावं तर शेतकऱ्यांच्या डोळ्यांतले अश्रू मोजा,'' असं एका शेतकऱ्याने हळहळ व्यक्त केली.

आक्रमक शेतकरी यांनी इशारा दिला आहे की, जर शासनाने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर तीव्र आंदोलन उभारले जाईल. ''हा लढा पैशाचा नाही, आमच्या अस्तित्वाचा आहे,'' असं शेतकऱ्यांचं स्पष्ट मत आहे.

शेतकरी पुत्र अमोल पळसकर यांची भावनिक प्रतिक्रिया सरकारने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. मेहकर आणि लोणार तालुक्यांमध्ये पिकांचं, जनावरांचं आणि घरांचं अमाप नुकसान झालं आहे. मी स्वतः एक शेतकरी आहे त्यामुळे शेतकऱ्याच्या जखमा आणि वेदना मी दररोज अनुभवतो.

शासनाने आमचा तालुका यादीतून वगळला.

काय आम्ही या मातीचे नाही का? आमचे दु:ख त्यांना दिसत नाही का? साहेब, आम्हीजिवंतअसतानाविचारतो जीव गेल्यावर मदत देता का हो? असा अन्याय आमच्यावर किती दिवस चालणार?''

शेतकरी अमोल पळसकर, डोणगाव

सरकारसमोर प्रश्न हा आवाज ऐकणार कोण?

शासनाने २५३ तालुक्यांचा समावेश केला असला, तरी न्याय आणि संवेदनशीलतेच्या कसोटीवर हा निर्णय टिकत नाही. ज्या भूमीत शेतकऱ्याचा घाम पावसाशी मिसळतो, त्या भूमीला आज शासनाच्या मदतीची आस लागली आहे. पण फाईलच्या आकड्यांमध्ये हा आक्रोश कुणाला ऐकू येतोय का?

शासनाने लक्षात ठेवावं शेतकरी फक्त मतदार नाही, तो या भूमीचा प्राण आहे. त्याच्या हातातलं बीज जर उगवेनासं झालं, तर आपल्या राज्याचं भविष्यही ओसाड होईल.

मेहकर आणि लोणारचा प्रश्न हा केवळ दोन तालुक्यांचा नाही, तर तो संपूर्ण शेतकरी समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. सरकारनेयावेदनेवरडोळेझाकनकरता, हृदय उघडून निर्णय घ्यावा कारण पिकं पुन्हा उगवतील, पण आशा मरली तर काहीही उरणार नाही.

## विविध वृत्त...

### विविध मागण्यांसाठी वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन



**नंदुरबार/प्रतिनिधी** : राज्यातील वीज कंपन्यांमधील खाजगीकरणाचा विरोध, जुनी पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदे भरणे, तसेच कर्मचारी कल्याणाशी संबंधित विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंता आणि अधिकारी कृती समितीच्या वतीने आज एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

गेल्या काही महिन्यांपासून समिती शासनाशी सातत्याने संवाद साधत आहे. शासनाकडून आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्षात वीज वितरण क्षेत्रात खाजगीकरणाची प्रक्रिया सुरूच असल्याचा आरोप समितीने केला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज नंदुरबारसह राज्यभर आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शासनाच्या धोरणांवर निषेध व्यक्त करत ''खाजगीकरण हद्दपार करा'', ''जुनी पेन्शन योजना लागू करा'', अशा घोषणा देण्यात आल्या. आंदोलन शांततामय पद्धतीने पार पडले.

कृती समितीचे पदाधिकारी म्हणाले की, ''राज्य शासनाने वारंवार दिलेली आश्वासने केवळ कागदावरच राहिली आहेत. वीज कंपन्यांचे खाजगीकरण केल्यास कर्मचारी, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घेऊन मागण्या मान्य कराव्यात.''

कृती समितीने इशारा दिला आहे की, जर शासनाने लवकरात लवकर मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर येत्या काळात आंदोलन अधिक तीव्र स्वरूपात केले जाईल.यशपाल गिरासे

### मंत्री विखे पाटील यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट; शरद पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** मराठा आंदोलक मनोज जरांगे आणि राज्याचे मंत्री तथा भाजपा नेते राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात बंद दाराआड साधारणत: दोन तास चर्चा झाली. यावेळी ओबीसी समाजाला आरक्षण देत असताना मराठा समाजाने विरोध केला नाही, तर आता मराठ्यांना मिळत असताना ओबीसी समाजाने विरोध का करावा? असा प्रश्न विखे पाटील यांनी उपस्थितीत केला. १९९४ मध्ये घेतलेला ओबीसी आरक्षणाच्या निर्णयात बदल केला असता तर विरोध करायला हरकत नव्हती, मात्र तुमचं कोणतेही नुकसान नसताना विरोध कशाला? असा सवालही त्यांनी केला.

मोर्चा कशाला काढता? : ''मराठा आरक्षणाबाबत काढलेल्या अध्यादेशाला स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला. त्यामुळे ओबीसी समाजाने मोर्चा काढण्याचे कारण नाही, कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. न्यायालय निर्णय देईल तो सर्वांनी मान्य करावा,'' असं मत राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडले. ''भुजबळ हे ज्येष्ठ नेते असून, त्यांच्यासोबत चर्चा करायला हरकत नाही. पहिल्यापासून भूमिका घेतली की, ज्यावेळी ओबीसींना आरक्षण दिले त्यावेळी मराठा समाजाने आक्षेप घेतला नाही. त्यामुळे आज ओबीसी समाजाने विरोध का करावा? तुमच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. विरोध का करता कळत नाही. हैदराबाद गॅजेट्सनुसार प्रक्रिया पुढे जाऊ द्या. मराठा समाजाने तुम्हाला कधीही विरोध केला नाही,'' अशी आठवणही त्यांनी ओबीसी नेत्यांना करुन दिली.

शरद पवारांमुळे समाजात विषमता : ''ओबीसी समाजाने मराठा आरक्षणाला विरोध केल्यास राज्यात विनाकारण विषमता निर्माण होईल. महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे. अनेक प्रगल्भ नेते होवून गेले व त्यांनी भूमिका घेतली. १९९४ साली शरद पवार यांनी मंडल आयोग अंमलबजावणी करताना सर्व समावेशक निर्णय घेतला असता तर हा प्रश्न उपस्थितीत झाला नसता. सामाजिक विषमता निर्माण करण्यामध्ये शरद पवार जबाबदार आहेत. त्यांनी खुलासा केला पाहिजे,'' अशी टीका विखे पाटील यांनी केली. ''आम्ही १९९४ मधील ओबीसी आरक्षणाचा निकाल बदला असं म्हणत नाही. बदलण्याची भूमिका असली असती तर विरोध करा. कायद्याचे राज्य म्हणतो तर न्यायालयाचा निर्णय येऊ द्या. तुमची भूमिका तुम्ही मांडा. न्यायालयात दावे दाखल करायचे अनब दुसरीकडे मोर्चे काढायचे योग्य नाही,'' अशी टीका देखील विखे पाटील यांनी केली.

छगन भुजबळ यांनी शरद पवार यांची फसवणूक केली : ''आमचे आरक्षण हक्काचे आहे आणि ते सोडणार नाही,'' अशी भूमिका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मांडली. ''शरद पवार यांनी ओबीसी समाजाला आरक्षण दिले, भुजबळ यांच्यासारख्या माणसाला मोठं केलं. आज हेच त्यांच्या विरोधात गेले.

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नामुळे २६ ऑक्टोवर पासून संभाजीनगर ते दिल्ली अशी नव्याने दोन विमानफेरी सेवा सुरु होणार

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलढाणा/प्रतिनिधी:** पश्चिम विदर्भ , मराठवाडा आणि खान्देशातील ऐतीहासीक, धार्मिक , जागतीकस्तरावरील पवर्टन स्थळांना भेट देणाऱ्या नागरिकच्या सेवेसाठी संभाजीनगर विमानतळावरून दिल्लीकरिता आणि दिल्लीवरून संभाजीनगरपर्यंत नव्याने दोन विमान सेवा फेरी सुरु करण्यात आली आहे . केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय विमान वाहतुकमंत्री किंजरापु नायडु यांच्या कडे यां संदर्भाची मागणी केली ती मागणी पुर्ण झाली असून ही विमान सेवा २६ ऑक्टोबर पासून जनतेच्या सेवेत रजु होत आहे.

पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्ह्याला लागूनच असलेले मराठवाड्यातील संभाजीनगर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रवास सेवेसाठी जवळचे आहे शिवाय बुलढाणा जिल्ह्यामध्ये संत गजानन महाराजांचे समाधीस्थळ आहे. लोणार येथे जगविख्यात खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर आहेत. राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्मस्थळ बुलढाणा जिल्ह्यातील सिदखेडराजा येथे आहे. संभाजीनगर जिल्ह्यामध्ये अजिंठा वेरूळची जगप्रसिद्ध लेणी आहेत या ऐतिहासिक, धार्मिक ,आणि



पर्यटन स्थळाला भेट देण्यासाठी देश विदेशातून पर्यटक येत असतात शिवाय संभाजीनगर, बुलढाणा, जालना, बीड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, येथील व्यापाऱ्यांना सुद्धा दिल्ली येथे व्यापारा निमित्त जाण्या येण्यासाठी सध्या, दिल्ली आणि संभाजीनगर दरम्यान दररोज दोन (०२) उड्डाणे (इंडिगो-६ई २३२४ आणि एअर इंडियाची ए१४४३) सेवा सुरू आहे. पूर्वी संध्याकाळी (०६.५० वाजता) एअर इंडिया (दिल्ली-औरंगाबाद-दिल्ली) ची अतिरिक्त विमानसेवा बंद करण्यात आली होती. ती सेवा पुन्हा करावी अशी मागणी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री किंजरापु नायडु यांच्या कडे केली होती ही मागणी पूर्ण झाली असून आता पूर्वीच्या दोन आणि नव्याने सुरू झालेली दोन अतिरिक्त विमानसेवा दिल्लीसाठी सुरू होत आहे ही विमान सेवा २६ ऑक्टोबर पासून जनतेच्या सेवात रजु होत आहे संभाजीनगर वरून दिल्लीकडे हे विमान सकाळी ८ वा ४० मिनिटांनी आणि दुपारी ४=३० वा जाणार आहे तर दिल्लीवरून संभाजीनगरकडे सकाळी ६ वाजता आणि दुपारी ३ वाजता निघणार आहे या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातून करण्यात आले आहे.

## जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

### सभापती, सदस्य पदांची आरक्षण सोडत १३ ऑक्टोबरला ; राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद गट व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समिती गणांच्या सार्वत्रिक निवडणुकीतील सभापती, सदस्य आरक्षण निश्चिती व सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद गटांची आरक्षण सोडत आणि सर्व पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत सोमवारी, १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे काढण्यात येणार आहे.

तसेच पंचायत समित्यांच्या गणांची आरक्षण सोडत त्या त्या तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात येणार आहे. त्यानुसार बुलढाणा तालुक्यातील पंचायत समिती निर्वाचक गणासाठी आरक्षणाची सभा ही जिल्हा नियोजन समिती सभागृह या ठिकाणी आयोजित केली आहे. या आरक्षण सभेस सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी व तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बुलढाण्याचे तहसिलदार विठ्ठल कुमरे यांनी केले आहे.

राज्य निवडकणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दि. ६ ऑक्टोबरपर्यंत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करुन विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे, दि. ८ ऑक्टोबरपर्यंत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देणे, दि. १० ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे, दि. १३ ऑक्टोबर रोजी आरक्षणाची सोडत काढणे, दि. १४ ऑक्टोबर रोजी प्रारुप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध करणे, दि. १४ ते १७ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करणे, दि. २७ ऑक्टोबर रोजी प्राप्त प्रारुप आरक्षणावरील हरकती व सूचना आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे, दि. ३१ ऑक्टोंबर २०२५ रोजी प्रारुप आरक्षणावर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन आरक्षण अंतिम करणे, दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे असा हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

## १४ वर्षीय मुलीचे अपहरण प्रकरणी तीन जण पोलिसांच्या ताब्यात

### नागरिकांच्या सतर्कतेने टळला मोठा अनर्थ; आरोपींना जमावाने बेदम चोप देत कार पेटवून दिली

**दैनिक आपला विदर्भ**

**मलकापूर/प्रतिनिधी** : मलकापूर शहरात अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न उघडकीस येत एकच खळबळ उडाली आहे. १४ वर्षीय मुलीचे स्विफ्ट कारमधून अपहरण करून मोताळा दिशेने नेत असताना, स्थानिक नागरिकांनी धाडस दाखवत कारचा पाठलाग केला आणि तिघा आरोपींना पकडले. जमावाने आरोपींना बेदम चोप दिला तसेच संतप्त नागरिकांनी आरोपींच्या कारची तोडफोड करून ती पेटवून दिली.





घटनेची माहिती मिळताच मलकापूर पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेत, परिस्थिती नियंत्रणात आणली आणि तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे पुढील मोठी घटना घडण्यापासून बचाव झाला.

प्राथमिक माहितीनुसार, मुलीला ओळखीच्या बहाण्याने कारमध्ये बसवून नेण्याचा प्रयत्न आरोपींनी केला होता. मात्र, स्थानिकांनी कारचा संशयास्पद प्रवास पाहून आरडाओरड केली आणि नागरिकांनीच कारचा पाठलाग सुरू केला. अखेर काही अंतरावर गाठ घेत आरोपींना पकडण्यात यश आले.

घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. संतापलेल्या जमावाने आरोपींच्या कारला आग लावल्याने पोलिसांना परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठा प्रयत्न करावा लागला.

मलकापूर पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

गणेश गिरी, पोलीस निरीक्षक, मलकापूर
१४ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या अपहरणाच्या प्रकरणी तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. मुलगी सुरक्षित आहे. घटनेचा तपास सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल.''